# महाराष्ट्र शासन

क्र. बैठक २०११/(९३/२०११)/तांशि-४
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : १२ मे, २०११.

प्रति,

१) श्री. बाळासाहेब वाघ, अध्यक्ष, इंजिनिअरींग असोसिएशन
२) श्री. अंकुशराव टोपे, जालना
३) डॉ. मंगेश कराड, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर, एमआयटी ग्रुप, पुणे
४) प्रो. पी. एन. कुलकर्णी, चिफ सेक्रेटरी, असोसिएशन
५) श्री. रविंद्र देशपांडे, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था
६) श्री. प्रकाश पाटील, सिंहगड इन्स्टिटयूट
७) श्री. के. बी. तारले, के. के. एज्युकेशन सोसायटी, नाशिक
८) डॉ. प्रमोद विटकर, राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे
९) डॉ. एच. के. अभ्यंकर, व्ही. आय.टी., पुणे.
१०) श्रीमती जयमाला गोडबोले, के. जे. सोमय्या
११) श्री. ईश्वर येलावट्टी, नागपूर
१२) श्री. समीर भिडे, सी. ए. , इंजिनिअरींग असोसिएशन
१३) श्री. अमित कोल्हे, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोपरगाव
१४) श्री. अमोल चव्हाण, तेरणा, मुंबई
१५) प्रा. के. एस. बंदी, को-ऑर्डिनेटर, इंजिनिअरींग असोसिएशन
१६) श्री. प्रमोद शिंदे, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, बारामती
१७) श्री. अभय किंमतकर, मेघे ग्रुप ऑफ इन्स्टिटयूशन्स, नागपूर.

विषय : **राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील विविध समस्यांसंदर्भात असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंटस ऑफ अनएडेड इंजिनिअरींग कॉलेजेस यांनी त्यांच्या दि.२२.४.२०११ रोजी दिलेल्या निवेदनाबाबत दिनांक ३ मे, २०११ रोजी मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त**

महोदय,

उपरोक्त विषयावर मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३ मे, २०११ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

आपला,

(भ. स. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत माहितीस्तव सादर-**

मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

## बैठकीचे कार्यवृत्त

विषय : **राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील विविध समस्यांसंदर्भात असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंटस ऑफ अनएडेड इंजिनिअरींग कॉलेजेस यांनी त्यांच्या दि.२२.४.२०११ रोजी दिलेल्या निवेदनाबाबत**

उपरोक्त विषयाबाबत मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३ मे, २०११ रोजी सकाळी ११.०० वाजता बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर/शासकीय अधिकारी उपस्थित होते.

१) मा. न्यायमूर्ती (निवृत्त), श्री. पी. एस. पाटणकर, अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती, मुंबई.
२) श्री. आचलिया, प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग
३) श्री. पी. ई. गायकवाड, कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण व शिक्षण शुल्क समिती, मुंबई.
४) डॉ. अभय वाघ, उप सचिव (तंत्र शिक्षण), उच्च व तंत्र शिक्षण विभाग
५) श्री. उ. शि. लोणारे, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग
६) श्री. शि. म. म्हात्रे, उप सचिव, वित्त विभाग
७) श्री. कैलास डी. भंडलकर, उप सचिव, आदिवासी विकास विभाग
८) डॉ. एस. के. महाजन, प्र. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९) श्री. गु. शि. धनोकार, संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई.
१०) श्री. ग. के. रहाटे, अवर सचिव, महसूल व वन विभाग
११) श्री. भ. सं. वानखेडे, अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग
१२) श्री. भो. गो. गोंदोळे, अवर सचिव, सामाजिक न्याय विभाग
१३) श्री. सुनिल मरळे, अवर सचिव, नगरविकास विभाग
१४) डॉ. व्ही. एम. मोहितकर, प्र. सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.
१५) श्रीमती ऐनूल अत्तार, प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.
१६) श्री. एस. व्ही. झणझणे, कक्ष अधिकारी, ऊर्जा विभाग
१७) श्री. प्र. सु. मोरे, एमएसईडीसीएल, एच.ओ. मुंबई, सीई

सदर बैठकीस असोसिएशन ऑफ दि मॅनेजमेंटस ऑफ अनएडेड इंजिनिअरींग कॉलेजेस या असोसिएशनचे आणि महाविद्यालयांचे खालील पदाधिकारी उपस्थित होते.

१) श्री. बाळासाहेब वाघ, अध्यक्ष, इंजिनिअरींग असोसिएशन
२) श्री. अंकुशराव टोपे, जालना
३) डॉ. मंगेश कराड, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर, एमआयटी ग्रुप, पुणे
४) प्रो. पी. एन. कुलकर्णी, चिफ सेक्रेटरी, असोसिएशन
५) श्री. रविंद्र देशपांडे, महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था
६) श्री. प्रकाश पाटील, सिंहगड इन्स्टिटयूट
७) श्री. के. बी. तारले, के. के. एज्युकेशन सोसायटी, नाशिक
८) डॉ. प्रमोद विटकर, राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे
९) डॉ. एच. के. अभ्यंकर, व्ही. आय.टी., पुणे.
१०) श्रीमती जयमाला गोडबोले, के. जे. सोमय्या
११) श्री. ईश्वर येलावट्टी, नागपूर
१२) श्री. समीर भिडे, सी. ए. , इंजिनिअरींग असोसिएशन
१३) श्री. अमित कोल्हे, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, कोपरगाव
१४) श्री. अमोल चव्हाण, तेरणा, मुंबई

१५) प्रा. के. एस. बंदी, को-ऑर्डिनेटर, इंजिनिअरींग असोसिएशन
१६) श्री. प्रमोद शिंदे, कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, बारामती
१७) श्री. अभय किंमतकर, मेघे ग्रुप ऑफ इन्स्टिटयूशन्स, नागपूर.

बैठकीच्या प्रारंभी मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सदर बैठकीचे प्रयोजन विशद केले. शैक्षणिक वर्ष २०११-१२ ची प्रवेशप्रक्रिया लवकरच सुरु होणार असल्यामुळे सदर प्रवेश प्रक्रिया अत्यंत चांगल्या पध्दतीने आणि विद्यार्थीभिमुख दृष्टीकोनातून होण्याकरिता असोसिएशनने केलेल्या सूचनांचे निश्चितच स्वागत असेल, असे मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी नमूद केले. तद्नंतर असोसिएशनच्या प्रतिनिधींनी त्यांच्या मागण्यांसंदर्भात Powerpoint Presentation उपस्थितांसमोर सादर केले.

त्यावर मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी उपस्थितांना असे सांगितले की, असोसिएशनने आपल्या मागण्यांच्या संदर्भात जे पत्र शासनास सादर केले आहे, त्या पत्रात अभियांत्रिकी महाविद्यालयासंदर्भात एकूण १९ मुद्दे अंतर्भूत असून तंत्रनिकेतनाशी निगडित ७ मुद्यांचा देखील त्यात समावेश आहे. तरी सदर मुद्देनिहाय चर्चा करुन त्यावर निर्णय प्रक्रियेस पोहोचणे योग्य ठरेल आणि त्यानुसारच बैठक पुढे चालविण्यात यावी, असेही मा. मंत्रीमहोदयांनी नमूद केले. त्यास उपस्थितांनी दुजोरा दिला. त्यानुसार सदर बैठकीमध्ये मुद्देनिहाय चर्चा झाली. या मुद्देनिहाय चर्चेचा गोषवारा थोडक्यात खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुद्दा | त्यावर झालेली चर्चा/निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून कार्यरत असणे गरजेचे असून सर्व संस्थांना येण्या-जाण्या करिता सोईच्या ठिकाणी (पुणे, औरंगाबाद) स्थापन होणे गरजेचे आहे. | यावर मा. मंत्रीमहोदयांनी असे नमूद केले की, राज्यामध्ये तंत्रशिक्षणाच्या विद्यापीठ निर्मितीसाठी माझ्या पातळीवरुन कसोशीने प्रयत्न केले जात आहेत. यासाठी मी स्वतः मा. मुख्यमंत्री तसेच मा. उपमुख्यमंत्री यांच्याकडे सादरीकरण केलेले आहे. या सादरीकरणामध्ये राज्यामध्ये तंत्रशिक्षण विद्यापीठाच्या निर्मितीच्या आवश्यकतेचा मुद्दा माझ्या वतीने मी हिरीरीने पुढे मांडलेला आहे. सदरहू विद्यापीठ कुठे होणार, यापेक्षा ते प्रथम होणे आवश्यक असून त्या बाबीस प्राधान्य देणे योग्य ठरणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे या विद्यापीठाची पुनर्रचना करुन विभागीय केंद्र मुंबई, पुणे, नागपूर आणि औरंगाबाद या शहरांमध्ये स्थापणे नियोजित आहे. त्याचप्रमाणे या विद्यापीठाची राज्यामध्ये अन्य ५ ठिकाणी उपकेंद्र (Sub-centre) निर्मितीचा प्रस्ताव देखील शासनाच्या विचाराधीन आहे. या विद्यापीठांकरिता योग्य तो निधी मिळविण्याच्या दृष्टीने मी प्रयत्नशील असून सदर विद्यापीठ आर्थिकदृष्टया सक्षम कसे राहील, याची देखील दक्षता घेणे आवश्यक आहे. या विद्यापीठाच्या निर्मितीसंदर्भात आवश्यक ते विधेयक तयार करण्यात आले असून या विधेयकाची प्रत असोसिएशनला उपलब्ध करुन देता येईल. नंतर असोसिएशनने सदर विधेयकाबाबत आपले अभिप्राय शासनास कृपया ८ दिवसांत सादर करावेत, अशीही विनंती मा. मंत्रीमहोदयांनी केली. |
| २ | डिप्लोमा टू डायरेक्ट सेकंड इयर अभियांत्रिकी प्रवेशास मॅनेजमेंट कोटा मिळण्याबाबत — लॅटरल एन्ट्रीच्या १२ | थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकीमध्ये १२ जागांपैकी २० टक्के जागा मॅनेजमेंट कोटयाद्वारे भरण्याची मागणी असोसिएशनच्या वतीने करण्यात आली. त्यावर मंत्रीमहोदयांनी उपस्थितांच्या असे निदर्शनास आणले की, थेट |

| | | |
|---|---|---|
| | जागांपैकी २० टक्के तसेच द्वितीय वर्षाकरिता स्वतंत्र डिव्हीजनमध्येही २०टक्के मॅनेजमेंट कोटा असावा. | द्वितीय वर्षाच्या प्रवेशाबाबत काही संस्थांच्या तक्रारी माझ्या निदर्शनास आल्या होत्या. तसेच या संदर्भात दोन वर्षांपूर्वी नागपूर अधिवेशनामध्ये देखील अशा प्रकारची चर्चा विधान मंडळात चालू असताना मी सभागृहाला या अभ्यासक्रमाच्या सर्व जागा हया केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत भरण्यात येतील, असे आश्वासन दिले आहे आणि त्यानुसार सदर आश्वासनाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. जर या प्रकरणी अन्य स्वरुपाचा वेगळा निर्णय घेतल्यास विधानमंडळाच्या अधिकाराचा अधिक्षेप (Breech of privilege) होऊ शकतो. म्हणून सदरहू मागणी कायदेशीरदृष्टया तपासून घेण्यात येईल. तशी तपासणी संचालक, तंत्रशिक्षण यांनी करावी आणि त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावा. |
| ३ | महाराष्ट्र विद्यापीठ ॲक्ट १९९४ बाबत सदर ॲक्ट बदलण्यासंबंधामध्ये असोसिएशनच्या पदाधिका-यांना समिती सदस्य म्हणून घेण्याबाबत. | या संदर्भात मा. मंत्रीमहोदयांनी उपस्थितांना असे निर्देश दिले की, निगवेकर समितीमध्ये असोसिएशनचा प्रतिनिधी समाविष्ट करण्याबाबत देखील आदेश काढावेत. त्यामध्ये खालील तीन जणांचा समावेश असावा.<br>१) डॉ. पी. एल. कुलकर्णी, सरचिटणीस<br>२) डॉ. एस. ए. हलकुडे, विभागीय अध्यक्ष, सोलापूर.<br>३) डॉ. मंगेश कराड, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर, एमआयटी, पुणे.<br>त्यास श्री. जाधव, उप सचिव (विद्यापीठ शिक्षण) यांनी सहमती दर्शविली. |
| ४ | मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती मिळण्याबाबत. | या संदर्भात मा. मंत्रीमहोदयांनी उपस्थितांना असे अवगत केले की, सामाजिक मागास तसेच आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थी निधी अभावी व्यावसायिक शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून शासनाने सामाजिक उत्तरदायित्व तसेच संविधानिक बांधीलकी या दृष्टीने शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना राज्यामध्ये चालू केली आहे. या योजनेंतर्गत लाखो विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाचा लाभ मिळालेला आहे. परंतु शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती विशेषतः सामाजिक न्याय विभागामार्फत पूर्णतः आणि वेळेवर होत नसल्याने त्यांच्या हक्काच्या निधीअभावी संस्थांना वंचित रहावे लागते. या शैक्षणिक संस्था सदरहू निधी विद्यार्थ्यांना आवश्यक तसेच अद्ययावत सुविधा उपलब्ध करण्यासाठी होऊ शकणार आहे. म्हणून सामाजिक न्याय विभागाने यासाठी आवश्यक ती तरतूद करुन सदरहू निधी शक्य तितक्या लवकर संबंधित संस्थांना वितरित कसा करता येईल, हे पाहणे आवश्यक ठरले आहे आणि त्यावरच या योजनेची यशस्विता अवलंबून राहणार आहे. याची नोंद सामाजिक न्याय विभागाने घ्यावी. त्यावर श्री. लोणारे, उप सचिव, सामाजिक न्याय यांनी असे नमूद केले की, योग्य तो निधी वित्त विभागाकडून यापूर्वी |

| | | |
|---|---|---|
| | | उपलब्ध न झाल्याने सर्व संस्थांना निधीचे पूर्णतः वितरण सामाजिक न्याय विभागास करता आलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. परंतु या वर्षी पुरेशी तरतूद उपलब्ध करुन घेण्याचे सामाजिक न्याय विभागाचे प्रयत्न राहणार आहेत. त्यामुळे कोणत्याही शैक्षणिक संस्थेचे निधी सामाजिक न्याय विभागाकडे प्रलंबित राहणार नाही. तसेच उपलब्ध निधी सर्व संबंधितांना वेळेवर कसा पोहोचविता येईल, याची काळजी घेण्याबाबत संचालक, सामाजिक न्याय विभाग यांना निर्देश देण्यात येतील, असेही उप सचिव, सामाजिक न्याय यांनी स्पष्ट केले.<br>त्यावर असोसिएशनच्या प्रतिनिधींनी असे नमूद केले की, शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच जर फी प्रतिपूर्तीची रक्कम संस्थांना शासनाकडून प्राप्त झाली तर सदर निधी आगाऊ स्वरुपात संस्थांना प्राप्त होऊन त्याचा विनियोग शिक्षणोपयोगी कार्यासाठी करता येऊ शकेल. यावर मा. मंत्री महोदयांनी असे निर्देश दिले की, (अ) दुसरे वर्ष, तिसरे वर्ष आणि चौथे वर्ष या अभ्यासक्रमाची १०० टक्के रक्कम ३० ऑगस्ट पर्यंत शैक्षणिक संस्थांना वितरित करावे. (ब) जी काही या योजनेची थकबाकी आहे, ती थकबाकी मात्र मे, २०११ अखेर पर्यंत संबंधित संस्थांना वितरित करावी. (क) प्रथम वर्षाची प्रवेशप्रक्रिया संपल्यानंतर म्हणजे सप्टेंबर अखेरपर्यंत प्रथम वर्षाचे ९० टक्के शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम संबंधित संस्थांना वितरित करणे आवश्यक राहील व १० टक्के उर्वरित रक्कम प्रवेश नियंत्रण समितीने गुणवत्ता याद्या मंजूर केल्यानंतर देण्यात यावी. (ड) या संदर्भात मा. उप मुख्यमंत्री, सामाजिक न्याय मंत्री, आदिवासी विकास मंत्री यांच्यासमवेत बैठक घेऊन वरीलप्रमाणे कार्यवाही होण्याकरिता संबंधितांपुढे प्रस्तावित करण्यात येईल. |
| ५ | शिक्षण शुल्क दरवर्षी ७ टक्क्यांनी वाढणार आहे त्याबाबत शासन आदेश होण्याबाबत<br>-शैक्षणिक वर्ष २००९-२०१० मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना दरवर्षी ७ टक्के वाढ धरुन त्यानुसार शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करावी. | शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून शिक्षण शुल्क समितीने प्रथम वर्षी निश्चित केलेली फी अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत दरवर्षी ७ टक्क्यांनी वाढविण्याचा निर्णय घेतलेला आहे. मात्र या बाबतीत शासनाचे आदेश निर्गमित न झाल्याने वाढीव प्रमाणात शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती संबंधित विभागाकडून करण्यात येत नाही. ही बाब असोसिएशनच्या प्रतिनिधींनी बैठकीत मांडली. याबाबत मा. न्यायमूर्तींनी दुजोरा दिला. शिक्षण शुल्क समितीचे अध्यक्ष, मा. न्यायमूर्ती (निवृत्त) श्री. पाटणकर यांनी सुध्दा सदर बाबतीत निर्णय झालेला असून तो वाढीव प्रमाणात शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादित केले. मा. मंत्री महोदयांनी सर्व संबंधित विभागांच्या मार्फत शिक्षण शुल्क समितीने घेतलेल्या निर्णयाच्या आधारे ७ टक्के वाढीव रकमेने ते ते अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती |

| | | |
|---|---|---|
| | | करण्याबाबतचा शासकीय आदेश तात्काळ निर्गमित करण्यास उच्च व तंत्र शिक्षण विभागास निर्देशित केले. |
| ६ | सहाव्या वेतन आयोगामध्ये शिक्षण शुल्कात वाढ होणेबाबत चर्चा करणे.<br>"शासन निर्णयानंतर सहाव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करावयाची झाल्यास शिक्षण शुल्कात वाढ करुन मिळणे गरजेचे आहे असे प्रतिपादन असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी केले. शासन निर्णयानंतर सहाव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करण्यात यावी. अंमलबजावणी केल्यानंतर १ महिन्याच्या पगारपत्रकासह प्रस्ताव शिक्षण शुल्क समितीकडे सादर करावा असे मंत्री महोदयांनी सांगितले. सहाव्या वेतन आयोगामुळे पगारावर पडणारा वाढीव बोजा हा सर्व विद्यार्थ्यांकडून (प्रथमवर्ष ते शेवटचे वर्ष) आकारण्यास परवानगी देणेबाबत योग्य ते शासन आदेश काढून शिक्षण शुल्क समितीस कळविण्यात येईल असे मा.मंत्री महोदयांनी सांगितले." | या संदर्भात मासिक पगार पत्रकाऐवजी सद्य:स्थितीत त्रैमासिक किंवा सहामाही पगारपत्रकाच्या आधारे शिक्षण शुल्क समितीकडे प्रस्ताव सादर करणे शक्य आहे किंवा कसे, तसेच या संदर्भात अन्य स्वरुपाचे ३ ते ४ पर्याय असोसिएशनने तयार करुन ते शिक्षण शुल्क समितीकडे सादर करावेत. यामध्ये ग्रामीण भागातील संस्थेचा वेगळया पातळीवर विचार करावा. सदर प्रस्तावावर १ महिन्याच्या आत शिक्षण शुल्क समितीने अंतिम निर्णय घ्यावा. |
| ७ | उच्च व तंत्र शिक्षणासाठी राज्य सल्लागार समितीची स्थापना करणे. | उच्च व तंत्रशिक्षणांतर्गत धोरणात्मक बदलाविषयी खालीलप्रमाणे तीन समित्या दिनांक २३.८.२०१० च्या शासन निर्णयान्वये गठित करण्यात आल्या आहेत, असे मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांनी बैठकीत विदित केले.<br>१) डॉ. अरुण निगवेकर यांच्या अध्यक्षतेखाली सध्या अस्तित्वात असलेल्या अधिनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी व कालानुरुप नवीन अधिनियम तयार करण्यासाठी समिती.<br>२) डॉ. राम ताकवले यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठांचे विभाजन करण्याकरिता समिती.<br>३) डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली उच्च शिक्षणामध्ये दर्जात्मक व गुणात्मक वाढ |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यासाठी, उपाययोजना सुचविण्यासाठी समिती. |
| ८ | एम.ई.आर.सी. ने चॅरिटेबल ट्रस्टला लागू केलेल्या नवीन विजेचा दर (टेरिफ) बाबत चर्चा करणे. | या संदर्भात असोसिएशनने सर्वसमावेशक प्रस्ताव तयार करुन तो MERC कडे सादर करावा. तसेच त्याच्या प्रती उच्च व तंत्र शिक्षण विभागास सादर कराव्यात. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने प्रस्तावावर सकारात्मक शिफारस करावी. |
| ९ | एफ.एस.आय. वाढविणेबाबत चर्चा करणे. | सध्या महानगरपालिका क्षेत्रामध्ये शैक्षणिक उपक्रमाकरिता २ आणि नगरपालिका क्षेत्रामध्ये १ चा एफ.एस.आय. प्रचलित पध्दतीनुसार देण्यात येतो. त्याऐवजी महानगरपालिका क्षेत्रामध्ये ४ आणि नगरपालिका क्षेत्रामध्ये २ चा एफएसआय देण्यात यावा, अशी मागणी असोसिएशनच्या प्रतिनधींनी केली. त्यावर असोसिएशनने अभ्यासपूर्ण सविस्तर प्रस्ताव तयार करुन शासनास सादर करावा व सदर प्रस्तावाचा सकारात्मक विचार होऊन तो नगर विकास विभागाकडे विचारार्थ सादर करण्यात येईल, असे मा. मंत्री महोदयांनी स्पष्ट केले. |
| १० | शैक्षणिक उपक्रमांसाठी जागा राखीव ठेवणेबाबत. | १० व ११) सद्य:स्थितीत प्राथमिक शिक्षण आणि माध्यमिक शिक्षणाकरिता राखीव भूखंड ठेवण्याची तरतूद आहे. परंतु त्याच धर्तीवर उच्च शिक्षण अथवा तंत्रशिक्षणासाठी तशा पध्दतीचा राखीव भूखंड ठेवण्यात येत नाही, असे असोसिएशनच्या प्रतिनिधींनी प्रतिपादित केले. त्यावर मंत्री महोदयांनी सूचित केले की, प्रचलित कायद्याचा अभ्यासक्रम संबंधित भूखंड उच्च व तंत्र शिक्षणाकरिता राखीव करता येईल किंवा कसे, याबाबत अभ्यासपूर्ण प्रस्ताव तयार करुन तो असोसिएशनने नगरविकास विभागास सादर करावा. प्रस्तावाची एक प्रत उच्च व तंत्र शिक्षण विभागास सादर करावी. त्याचा सकारात्मक विचार करण्यात येईल. |
| ११ | स्पेशल एज्युकेशन झोन होण्याबाबत. | |
| १२ | संस्थेने धारण केलेल्या जमीनीस शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ अन्वये कलम ४७ (२) अ खाली सूट मिळणेबाबत. | शेतजमीन अधिनियम, १९६१ च्या कलम ४७(२) नुसार ५५ एकरपेक्षा अधिक जमीन असेल तरच त्यातून सूट मिळण्यासाठी परवानगी घेण्याची आवश्यकता भासते. अन्यथा, ५५ एकराच्या आतील जमीन शैक्षणिक प्रयोजनासाठी उपलब्ध होऊ शकते, असे नगर विकास विभागाचे अवर सचिव यांनी बैठकीत सादर केले. त्यावर श्री. वाघ, असोसिएशनचे अध्यक्ष यांनी असे नमूद केले की, कृषि महाविद्यालयाकरिता शेकडा एकर जमीनीची आवश्यकता भासते व तेवढी जमीन नगर विकास विभागामार्फत उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होतात. त्यावर मा. मंत्री महोदयांनी असे नमूद केले की, शैक्षणिक प्रयोजनासाठी जमीन देताना शासनाने उदार धोरण स्वीकारणे आवश्यक ठरते. त्यानुसार नगर विकास विभागाने त्वरेने जमीन उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. |

| | | |
|---|---|---|
| १३ | होस्टेलचे वीज बिल हे घरगुती वीज ग्राहकाप्रमाणे बील आकारणेबाबत. | शैक्षणिक संस्थांच्या संबंधित हॉस्टेलचे वीज बील हे घरगुती ग्राहकांप्रमाणे आकारण्यात येत असल्याबाबत ऊर्जा विभागाच्या अधिका-यांनी प्रतिपादित केले. |
| १४ | ऑक्ट्राय माफ होणेबाबत. | सदर बाबत नगर विकास विभागाने धोरणात्मक निर्णय घ्यावा. |
| १५ | संस्थेस कर्ज घेणेसाठी सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांची परवानगी घ्यावी लागते याबाबत. | संस्थेस कर्ज घेण्यासाठी धर्मादाय आयुक्तांच्या परवानगीस बराच कालावधी लागत असल्याचे असोसिएशनच्या प्रतिनिधींनी प्रतिपादित केले. त्यावर प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांनी असे स्पष्ट केले की, अर्ज पूर्ण नसल्यामुळे तसेच संस्थेने पूर्वी घेतलेले कर्ज नमूद न केल्यामुळे धर्मादाय आयुक्तांकडून प्रमाणपत्र देण्यास विलंब होतो. मनुष्य बळ कमी असल्यामुळे सदर विलंब लागत असला तरी मात्र हेतुपुरस्सर विलंब होणार नाही, याची काळजी घेण्यात येईल. तसेच धर्मादाय आयुक्त कार्यालयातील पदे रिक्त असल्यामुळे संस्थेची कर्ज प्रकरणे निकाली काढण्यास विलंब लागतो. तथापि, या प्रकरणी मी स्वतः धर्मादाय आयुक्तांना शैक्षणिक संस्थांच्या कर्जाबाबतचे प्रकरण तात्काळ निकाली काढण्याबाबत सूचना देईल आणि जागा त्वरित भरण्यात येतील, असेही प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांनी नमूद केले. |
| १६ | शिक्षण शुल्क समिती व प्रवेश नियंत्रण समितीमध्ये शासनाची व असोसिएशनची भूमिका मांडणेबाबत. | असोसिएशनच्या प्रतिनिधींनी सदरहू मुद्दा बैठकीत उपस्थित केल्यानंतर मा. मंत्री महोदयांनी असोसिएशनला तसेच शिक्षण शुल्क समितीच्या अध्यक्षांना असे सूचित केले की, उभयतांच्या दरम्यान त्रैमासिक बैठका घेण्यात याव्यात. या बैठकांमध्ये उभय संस्थांमध्ये वैचारिक देवाणघेवाण होऊन योग्य निर्णय घेण्याची प्रक्रिया सुलभ होईल. तसेच मंत्री महोदयांनी पुढे असेही नमूद केले की, विभागाचे सचिव हे सर्व शिक्षण शुल्क व प्रवेश नियंत्रण समितीच्या बैठकांना उपस्थित राहतील याची विभागाने दक्षता घ्यावी. प्रसंगी विभागाचे प्रतिनिधी सदर बैठकीस उपस्थित राहतील. |
| १७ | प्रथम वर्षात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पात्रतेबाबत.<br>- ए.आय.सी.टी.ई. ॲप्रुव्हल प्रोसेस हॅण्डबुक २०११-१२ प्रमाणे प्रथम वर्षात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना पी.सी.एम.मध्ये ५०टक्के गुण असणे आवश्यक आहे. त्याऐवजी १०+ २ पास असे असणे गरजेचे आहे. याबाबत असोसिएशनने ए.आय.सी.टी.ई. ला विनंती | या संदर्भात श्री. मंगेश कराड यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, तामिळनाडूमध्ये प्रवेशप्रक्रियेच्या संदर्भात कायदा अस्तित्वातआहे. त्यामुळे त्या राज्यास अनुकूल असलेले धोरण राबविणे सहजशक्य होते. तशा पध्दतीची कार्यप्रणाली महाराष्ट्र राज्यानेही अनुसरणे योग्य ठरेल. त्यावर मंत्रीमहोदयांनी असे निर्देश दिले की, श्री. मंगेश कराड यांच्यासह असोसिएशनचे दोन प्रतिनिधी, संचालक, तंत्रशिक्षण व उप सचिव (तंत्रशिक्षण) यांनी एकत्रित बसून तामिळनाडू राज्याच्या धर्तीवर कायदा तयार करणे शक्य आहे किंवा कसे, याचा अहवाल सादर करावा. |

| | | |
|---|---|---|
| | केलेली आहे. शासनानेही ए.आय.सी.टी.ई. कडे याबाबत प्रस्ताव पाठविणे अपेक्षित आहे. | |
| १८ | नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडीएशनच्या फी कमी करण्याबाबत. | संचालक (तंत्रशिक्षण) यांनी असे नमूद केले की, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अध्यक्षांसमवेत डिसेंबर २०१० मध्ये झालेल्या बैठकीत सदर बाबतची विनंती करण्यात आलेली आहे. तसेच याबाबतीत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस प्रस्ताव सादर करण्यात येईल. |
| १९ | मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीबाबत.<br>मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने महाराष्ट्रातील विनाअनुदानित संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात यावी, असा निर्णय २०११ रोजी दिलेला आहे. शासनाच्या CAP मधून अथवा CAP मधून प्रवेश घेतला नसेल तरी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात यावी, असा तो निर्णय आहे. तथापि, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या विभागीय कार्यालयामार्फत ईबीसीचे फॉर्म स्वीकारले जात नाहीत. सदर फॉर्म स्वीकारण्याबाबत योग्य त्या सूचना द्याव्यात. तसेच, समाजकल्याण, आदिवासी विकास विभागाच्या जिल्हा कार्यालयात फॉर्म स्वीकारण्याबाबत योग्य तो पत्रव्यवहार होणे अपेक्षित आहे. | या मुद्यासंदर्भात असोसिएशनच्या प्रतिनिधींनी मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निर्णयाची माहिती उपस्थितांना सांगितली. त्यावर मा. मंत्री महोदयांनी असे स्पष्ट केले की, असोसिएशनचे प्रतिनिधी, श्री. बंदी यांनी दोन न्यायालयीन प्रकरणांच्या याचिका, शासनाचे शपथपत्र आणि या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिले आदेश, इत्यादी कागदपत्रांसह संचालक (तंत्रशिक्षण) यांच्याशी चर्चा करावी व संचालक (तंत्रशिक्षण) यांनी तंत्रनिकेतनांना शासनाच्या प्रतिपूर्तीच्या धोरणाच्या पार्श्वभूमीवर CAP प्रवेशित विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू करावी किंवा कसे, याबाबत कायदेशीर सल्ला घेऊन सर्वसमावेशक असा प्रस्ताव तयार करावा व तो शासनास दोन दिवसांत सादर करावा. |
| २० | आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना ईबीसीची सवलत मिळण्याबाबत.<br>इयत्ता बारावीनंतर प्रथम वर्ष तंत्रनिकेतनमध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांना इबीसीची सवलत मिळत नाही. कारण सदर विद्यार्थ्यांना ते इयत्ता ११वी आणि १२वी मध्ये असतोना | अशा पध्दतीचा प्रस्ताव संचालक (तंत्रशिक्षण) यांनी त्वरित तयार करुन शासनास सादर करावा. शासनानेही यावर त्वरित कार्यवाही करुन आदेश पारित करावेत. |

| | | |
|---|---|---|
| | त्यांनी सदर योजनेचा लाभ घेतलेला असतो. इयत्ता ११वी वी व १२वीं चे शुल्क अत्यल्प असते. ते वजा करुन तंत्रनिकेतनाची उर्वरित फी शासनाने द्यावी. | |
| २१ | शैक्षणिक वर्ष २०१०-११ मध्ये झालेल्या प्रवेशाबाबत व २०११-१२ च्या प्रवेशाबाबत<br>शैक्षणिक वर्ष २०१०-११ मध्ये राज्यात ३०,००० जागा रिक्त राहिलेल्या आहेत. प्रथम वर्ष तंत्रनिकेतन प्रवेश प्रक्रिया २०११-१२ ची १०वीच्या परीक्षेच्या निकालानंतर त्वरित सुरु करावी व कमी कालावधीमध्ये पूर्ण करण्यात यावी. तसेच विद्यार्थ्यांच्या सोयीकरिता ARC ची संख्या वाढवावी. | ARC संदर्भात मा. मंत्रीमहोदयांनी दिनांक १६.१२.२०१० रोजी नागपूर येथे संस्थाचालकांशी झालेल्या बैठकीत असे निर्देश दिले होते की, खाजगी संस्थांना ARC देऊ नये. मात्र संचालक (तंत्रशिक्षण) यांनी असे नमूद केले की, नवीन संस्थांना ARC न देता ५ वर्षे जुन्या असणा-या संस्थांकडे सोयीसुविधा व कुशल मनुष्य बळ उपलब्ध असल्यामुळे अशा संस्थांना ARC देणे प्रस्तावित केले. तसेच ARC बाबतच्या तक्रारींना आळा घालण्याच्या दृष्टीने शासकीय संस्थांतील प्रतिनिधी ARC वर नियुक्त करण्यात येतील.<br>आवश्यक तेवढे ARC राज्यामध्ये निर्माण करावीत. जेणेकरुन ग्रामीण अथवा नागरी अशा कोणत्याही विद्यार्थ्यावर अन्याय होणार नाही, याची काळजी घ्यावी, असे मंत्री महोदयांनी निर्देशित केले. |
| २२ | थेट द्वितीय वर्ष तंत्रनिकेतनामध्ये प्रवेश घेणा-या महाराष्ट्राबाहेरील आयटीआय धारक विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत | राज्यातील विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश दिल्यानंतर रिक्त राहिलेल्या जागांवर राज्याबाहेरील विद्यार्थ्यांची प्रवेशाबाबतची तरतूद नियमावलीमध्ये प्रस्तावित करण्याचे मा. मंत्रीमहोदयांनी आदेशित केले. |
| २३ | महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या विभागीय कार्यालयांची संख्या वाढविणेबाबत. | संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांनी असे नमूद केले की, विभागीय कार्यालयांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. मात्र त्यासाठी पुरेसा कर्मचारी वृंद आणि जागेची उपलब्धता असणे देखील आवश्यक आहे. त्यासाठी अधिनियमात योग्य तो बदल करावा लागेल, असे नमूद केले. त्यावर या प्रकरणी त्वरित निर्णय घ्यावा, असे मा. मंत्रीमहोदयांनी श्री. धनोकार, संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांना निर्देश दिले. |
| २४ | शैक्षणिक वर्ष २०११-१२ प्रथम वर्ष तंत्रनिकेतन प्रवेशाबाबत<br>CAP मध्ये समाविष्ट होण्याचे तंत्रनिकेतनांना स्वेच्छाधिकार असावेत. | मंत्रीमहोदयांनी या वर्षी देखील केंद्रिय प्रवेश प्रक्रियेची (CAP) कार्यपध्दती तंत्रनिकेतनांना ऐच्छिक तत्वावर मान्य केली. मा. मंत्री महोदयांनी असेही निदर्शनास आणले की, ज्या संस्था CAP मध्ये समाविष्ट होणार नाहीत, अशा संस्थांना शासनाची फी प्रतिपूर्ती योजना लागू राहणार नाही. (सदरहू मुद्दा मुद्दा क्रमांक १९ शी सुध्दा निगडित आहे.) |
| २५ | ३५ विनाअनुदानित तंत्रनिकेतनांनी शिक्षण शुल्क समितीला प्रस्ताव न केल्याबाबत | यावर मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती, श्री. पाटणकर यांनी असे नमूद केले की, अशा तंत्रनिकेतनांना त्यांचा प्रस्ताव शिक्षण शुल्क समितीला सादर करण्यास पुरेसी मुदत दिलेली असल्याने त्यांना पुन्हा मुदतवाढ देणे योग्य ठरणार नाही. |

शेवटी मा. मंत्री महोदय आणि असोसिएशनच्या अध्यक्षांनी उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे घोषित केले.

-x-x-x-x-x-